# को-ऑप. हौसिंग सोसायटी, खाजगी कार्यालय व धार्मिक ठिकाणी सुरक्षेबाबत काय करावे व काय करु नये (Do's & Don'ts) याबाबत खालीलप्रमाणे सुचना अमलात आणाव्यात.

## अ) को-ऑप.हौसिंग सोसायटी, अस्तित्वात असलेल्या आस्थापना/इमारत.

### १) को-ऑप.हौसिंग सोसायटी, असलेल्या आस्थापना/इमारतीबाबत करावयाच्या उपाययोजना.

१. अस्तित्वात असलेल्या हौसिंग सोसायटीचे कंपाऊंड मजबुत व त्यावर काटेरी तारेच्या जाळया बसवुन घ्याव्यात.

२. हौसिंग सोसायटी मध्ये येण्या-जाण्यासाठी एका पेक्षा जास्त प्रवेशद्वार ठेवु नये, एकच प्रवेशद्वार ठेवावे.

३. बिल्डींगमधील सर्व फ्लॅटच्या दर्शनि दरवाज्यास तसेच सर्व प्रवेशद्वारास लोखंडी ग्रील बसवावे. व त्यास चांगल्या दर्जाचे कुलुप लावावे.

४. इमारतीच्या सर्व बाजुस चांगली प्रकाश व्यवस्था करण्यात यावी.

५. मुख्य प्रवेशाच्या ठिकाणी तसेच इमारतीच्या चारही बाजुंनी सर्व ॲंगल्स सीसीटीव्हीद्वारे कव्हर होतील अशा प्रकारे सीसीटीव्ही पुरेशा प्रमाणात लावावेत.

६. को-ऑप.हौसिंग सोसायटीच्या क्षेत्रानुसार पुरेशा प्रमाणात तरुण व सदृढ सुरक्षा रक्षक ठेवण्यात यावेत. त्याप्रमाणे सोसायटीमध्ये येणाऱ्या व्यक्तींबाबत माहितीची नोंद घेण्यासाठी नोंदवही ठेवुन त्यामध्ये त्या व्यक्तिचे नाव, पत्ता, मोबाईल नंबर, कोणाकडे जाणार आहे, इ. बाबत नोंद घ्यावी.

७. सोसायटी मध्ये ठेवण्यात येणारे सुरक्षा रक्षकांचे चारित्र्य पडताळणी करुन घ्यावी. तसेच त्याचेकडुन त्याचे फोटो व वैयक्तिक माहिती घेवुन तशी नोंद सोसायटीच्या कार्यालयात ठेवावी.

८. रात्रगस्तीच्यावेळी सुरक्षा रक्षक आपले कर्तव्य व्यवस्थित बजावत आहेत किंवा नाही याबाबत सोसायटीच्या कार्यालयास कळवावे व त्याच्या नोंदवहीत भेट दिल्याची नोंद करावी.

९. सोसायटी/सुरक्षा रक्षकाकडे पोलीस ठाण्याचा दुरध्वनी क्रमांक असणे अति आवश्यक आहे.

१०. को-ऑप.हौसिंग सोसायटीमध्ये पोलीस ठाणेस/चौकीस तात्काळ संपर्क होईल अशी अलार्म सिस्टीम ठेवण्यात यावी.

११. सोसायटीमध्ये नेहमी येणारे वर्तामानपत्र विक्रेते, सफाई कामगार, ड्रायव्हर, लॉन्ड्रीवाले, भाजी विक्रेते यांची वेगळी नोंद वही ठेवण्यात यावी.

१२. बाहेरगावी जाताना स्थानिक पोलीस ठाणेस तसेच शेजाऱ्यास कळवावे. तसेच घरातील मौल्यवान वस्तु, पैसे दागिने हे बॅंकेच्या लॉकरमध्ये ठेवावे. तसेच मौल्यवान वस्तुंचा विमा करावा.

१३. सोसायटीमध्ये इमर्जन्सी लाईट व्यवस्था असावी.

को-ऑप. हौसिंग सोसायटी अस्तित्वात असलेल्या आस्थापना / इमारतीबाबत काय उपाययोजना करु नये -

१. घराला लावण्यात येणारे ग्रील हे हलक्या प्रतिचे नसावे.

२.रात्रीचे वेळी घराचा दरवाजा उघडतांना बाहेरील व्यक्तिची ओळख पटल्याशिवाय दरवाजा उघडू नये.

३. को-ऑप हौसिंग सोसायटीमध्ये पडीक / निर्जन भाग ठेवु नये

४. घरात अनावश्यक मौल्यवान वस्तु व दागिने, पैसे न ठेवता ते बँकेतील लॉकरमध्ये ठेवावेत

५. अनोळखी व्यक्ती, सेल्समन, सेल्सगर्ल किंवा फिरते विक्रेते यांचेवर विश्वास ठेवू नये. सोने उजळून देणारे व्यक्ति तसेच इतर काही कारणे सांगून येणारे व्यक्तिंना अजिबात प्रवेश देवू नये.

६. मौल्यवान वस्तु उघड्यावर अथवा खिडकीजवळ त्या सहज काढून घेता येतील अशा जागी ठेवू नये.

७. पोलीस ठाणेकडून चारित्र्य पडताळणी केल्याशिवाय सुरक्षा रक्षक नेमू नये.

## २) खाजगी कार्यालयामध्ये काय करावे याबाबत

१) अस्तित्वात असलेले कार्यालय आर्थिक व्यवहार असलेले कार्यालय (बँका, पतसंस्था, चीटफंड, इत्यादी) इमारतीचे सुरक्षा ऑडीट करुन कमतरता असलेल्या बाबी उदा. एकच प्रवेशद्वार त्यांस Z टाईप प्रवेशद्वार व एक्झीट ठेवावे.

२) खिडक्या व दरवाजे यांच्या ग्रिल्स स्क्रुवर फिट केलेल्या नसाव्यात, तर त्या इमारतीचे भिंतीत फिक्स कराव्यात.

३) सेंट्रल लॉक सिस्टीम व सी.सी.टी.व्ही. यंत्रणा नसेल तर कार्यालयाच्या आतील व बाहेरील बाजुस बसवून घ्यावी. तसेच alarm व्यवस्था असावी.

४) कॅश काऊंटर जाळीचे असावे व आर्थिक व्यवहार चालणा-या कार्यालयांध्ये आवशयकतेप्रमाणे बंदुक परवानाधारक सुरक्षा रक्षक नेमावा.

५) आपत्कालीन परिस्थिती संबंधाने उपाययोजना करण्याचे दृष्टीने कार्यालयाचे ठिकाणी अंतर्गत रस्ते पुरेशे रुंदीचे आसावेत.

६) भिंती व स्ट्राँगरुम भक्कम व कार्यालयांचे प्लॅस्टर करतेवेळी त्यामध्ये जाळी टाकुन करावे.

७) कार्यालयात नेमण्यात येणारे सुरक्षा रक्षक यांचे चारित्र्य पडताळणी करुन त्यांचे फोटो, वैयक्तीक माहितीची स्वतंत्र फाईल ठेवावी.

८) कार्यालयामध्ये येणारे इसमांची नोंदणी/माहिती नेमण्यात येणारे सुरक्षा रक्षक यांचेकडे ठेवावी.

९) खाजगी कार्यालयामध्ये काही घटना घडल्यास अशा वेळी पोलीस ठाणेस / चौकीस तात्काळ संपर्क होईल अशी स्वयंचलीत अलार्म सिस्टीम ठेवण्यात यावी व त्याची बटणे दोन ते तीन ठिकाणी ठेवावीत.

**खाजगी कार्यालयामध्ये काय करु नये -**

१) कार्यालयांस बाहेर जाणारे व येणारे अनेक गेट असु नयेत.

२) आर्थिक व्यवहार चालणाऱ्या कार्यालयांमध्ये रोख रक्कम घेवून जाताना एकाचा व्यक्तीवर जबाबदारी सोपवू नये. सोबत हत्यारी सुरक्षा रक्षक नेमावा.

## ३) धार्मिक ठिकाणी करावयाच्या उपाययोजना

१) अस्तिवात असलेल्या धार्मिक स्थळाचे ठिकाणी दिवसा/रात्री शक्य असल्यास परवानाधारक सुरक्षा रक्षक नेमण्यात यावे.

२) धार्मिक ठिकाणी काही अनुचित प्रकार घडू नये या करीता सी.सी.टी.व्ही. कॅमे-याची यंत्रणा बसविण्यात यावी, व CCTV ने धार्मिक स्थळाबाहेरील भाग ही कव्हर करावा. मौल्यवान गोष्टीसाठी alarm लावावा.

३) धार्मिक स्थळाचे ठिकाणी दरवाजे मजबुत व भक्कम असावेत.

४) मंदीराचे ठिकाणी दानपेटी जमीनीत भक्कम बसविण्यात यावी. त्यावर CCTV चा focus असावा.

५) धार्मिक स्थळाचे ठिकाणी नेमण्यात येणारे सुरक्षा रक्षकांची पोलीसांकडून चारित्र्याची पडताळणी करुनच त्यांना सुरक्षा रक्षक म्हणुन नेमण्यात यावे.

६) ज्या ठिकाणी मुर्ती आहे, त्याचे दर्शनाकरीता जाणेसाठी महिलांच्या व पुरुषांच्या स्वतंत्र रांगा ठेवण्यात याव्यात व आत येणेसाठी व बाहेर पडणेसाठी वेगवेगळे दरवाजे ठेवावेत.

७) धार्मिक स्थळाचे ठिकाणी पुरेशी लाईटची व्यवस्था करण्यात यावी.

८) धार्मिक स्थळाचे ठिकाणी भाविकांकडून जमा होणा-या रक्कमेची ऑडीट करुन घेण्यात यावे.

९) नवीन मंदीराचे बांधकाम करतेवेळी मंदीराचा गाभारा उंच असावा मंदीर बांधतानाच आपत्कालीन रस्त्याचेही नियोजन करावे.

१०) मौल्यवान गोष्टी वेळोवेळी लिलाव करुन रक्कम बॅकेत ठेवावी.

**<u>धार्मिक ठिकाणी काय करु नये याबाबत</u>**

१) दानपेटया वेळोवेळी रिकाम्या कराव्यात मंदीरात रात्रीच्या वेळी दानपेटी मध्ये दिवसभरात जमा झालेली रक्कम ठेवण्यात येऊ नये.

२) देवी देवतांच्या अंगावर मौल्यवान दागदागीने ठेवू नये.

३) रात्री CCTV बंद करु नये.

**ब) इमारत बांधतेवेळी सुरक्षेच्या दृष्टीकोणातून काय करावे.**

१) इमारतीचे चारही बाजुला मोकळी जागा सोडावी, जेणे करुन काही घडना घडल्यास सुरक्षेच्या दृष्टीने हालचाली करता येतील.

२) नवीन बांधकाम करताना खिडकीचे लोखंडी ग्रील हे भिंतीत बसवावे.

३) नवीन बांधकाम करताना चांगल्या प्रतिचे साहित्य वापरावे.

४) मोठे कार्यालय / मॉल / इमारती यांचा प्रवेशद्वार व बाहेर जाण्याचा दरवाजा मोठा असावा.

५) नवीन इमारतीचे वॉल कंपाऊड उंच व त्यावर तारेचे कुंपण असावे.

६) धार्मिक स्थळाचे दरवाजे चांगल्याप्रतिचे असावे व दानपेट्या जमिनीमध्ये या फिट असाव्यात.

७) इमर्जन्सी / सिक्युरिटी अलार्म डे / नाईट मोड असणारा असवावा, तसेच त्यासंबंधी नजीकच्या पोलीस ठाण्यास स्वयंचलित कॉल होण्याची सुविधा असावी.

**इमारत बांधतेवेळी सुरक्षेच्या दृष्टीकोणातून काय करु नये.**

१) ईमारतीचे खिडक्या / दरवाजे स्क्रुने फिट केलेले नसावे.

२) हलक्या प्रतिचे साहित्य वापरु नये.

३) इमारतीला अनेक प्रवेशद्वार नसावेत.